संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# निवडणुकीच्या धामधुमीत दरवाढीचे तडाखे

**एकीकडे** लोकसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत आश्वासनांची खैरात होण्याची शक्यता असतानाच दुसरीकडे महाराष्ट्रात मात्र ऐन उन्हाळ्यात वीज दरवाढ आणि दूध भाववाढीचे तडाखे लोकांना सहन करावे लागतील. राज्य वीज वितरण कंपनीने घरगुती आणि व्यापारी वीज वापराच्या दरात युनिटमागे अंदाजित सरासरी एक रुपया ते तीन रुपये अशी वाढ सुचवली आहे. उन्हाचा कडाका वाढत असताना वीजेच्या दरवाढीचा हा शॉक म्हणजे लोकांना गृहित धरण्याचाच प्रकार ठरतो. काळवेळ न पाहाता लोकांवर केव्हाही दरवाढ लादली तरी चालते. लोक ती मुकाट्याने सहन करतील असा राज्यकर्त्यांचा हेतू असतो. अर्थात सध्या आचारसंहिता लागू झालेली आहे. त्यामुळे हा निर्णय अधिकारी स्तरावर घेतला गेलेला दिसतो. खरे तर आचारसंहितेमध्ये अनेक नवीन कामे सुरु केली जात नाहीत. मग ती लोकांसाठी दिलासा देणारी जरी असली तरी आचारसंहितेचे कारण पुढे करून ही कामे होत नाहीत. मग दरवाढीसारखा निर्णयसुध्दा आचारसंहितेत लागू व्हायला नको. या निर्णयापाठोपाठ आता मुंबईतील तबेलेवाल्यांनी म्हशीच्या दुधाच्या दरात लीटर मागे दोन ते तीन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. मुळातच मुंबईत दुधाचे भाव सर्वात जास्त आहेत. तबेले वाल्यांवर आता अचानक असे कोणते संकट कोसळले की, त्यांनी हा दरवाढीचा निर्णय घेतला. त्यातून एकच अर्थ स्पष्ट होतो की सरकारी योजनांमधून होणारा दूध पुरवठा लोकांचा विश्वास मिळवू शकलेला नाही. आणि तबेल्यावाल्यांच्या दुधाला लोकांकडून जास्त मागणी असावी. कारण मागणी वाढल्याने भाववाढ करावी लागत असते. तबेलेवाल्यांचा दूध व्यवसाय हा पूर्णपणे खाजगी स्वरूपाचा असल्याने त्याच्यावर सरकारचे नियंत्रण नसते. स्वाभाविकपणे त्यांनी केलेली दरवाढ लोकांना स्वीकारण्याशिवाय पर्यायही राहात नाही. दूध दरवाढ असो की वीज दरवाढ असो यामधून सामान्य माणसाचे महिन्याचे गणित मात्र कोलमडत असते. ही दरवाढ अगदी दोन चार रुपयांची जरी असली तरी महिन्याकाठी हा भार हजार रुपयांपर्यंत जाऊन पोहचतो. खरे तरी ही दरवाढ म्हणजे एक इशाराच म्हणायला हवा.

### नव्या दरवाढीची शक्यता

निवडणुकीनंतर अनेक गोष्टींचे दर वाढू शकतात. कारण पुढे पाच वर्षे कोणालाही कोणते आश्वासन द्यायचे नसते किंवा मतदारांना भेटायचेही नसते. प्रामुख्याने केंद्रीय स्तरावर रेल्वे भाडेवाढीच्या शक्यता नाकारता येत नाही. तर गेल्या काही दिवसांपासून नियंत्रणात असलेले पेट्रोल डिझेलचे दरही वाढू शकतात आणि एकदा का हे दर वाढायला सुरुवात झाली की मग स्वाभाविकपणे इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीही वाढू लागतात कारण मालाची ने-आण करण्याचा खर्च वाढल्याने त्याचा परिणाम अन्य वस्तूंवर किंवा व्यवस्थेवरही होतो. नव्याने येणारे सरकार विजयामुळे उत्साहात असते. आणि जनतेला चांगली सेवा देण्याच्या नावाखाली त्यांना अनेक वस्तू किंवा सेवांची दरवाढ करणे गरजेचे वाटू लागते. अनेक निवडणुकांनंतरचा हा अनुभव आहे. त्यातही यावर्षी सादर झालेले केंद्रीय अंदाजपत्रक अजून संसदेने मंजूर करायचे आहे, संसदेमध्ये ते मंजुरीला आल्यानंतर त्यात बऱ्याच सुधारणा होतील. खरे तर वस्तुसेवाकरामुळे सरकारने कोणतीही दरवाढ करण्याची आवश्यकता नाही. उलट अनेक वस्तूंवरचे दर कमी केले पाहिजेत. घरांच्या किंमती किंवा प्रवासी भाडे यावर आकारला जाणारा वस्तुसेवा कर अजूनही अन्यायकारक असल्याचे लोकांचे मत आहे. त्यातही आयकराच्या वसुलीतून सरकारला बऱ्यापैकी उत्पन्न मिळत असते. ती आयकराची वसुलीदेखील गेल्या काही वर्षात वाढली असल्याचे केंद्र सरकारचे म्हणणे आहे जर अशी वाढ झाली असेल तर दरवाढ करण्याची आवश्यकता उरत नाही. उलट केंद्र असो वा राज्य सरकार असो या दोघांनीही काटकसर करून जनतेला दिलासा दिला पाहिजे. मंत्र्यांना, खासदारांनी आपल्या मानधनात कपात करण्याची तयारी दाखवली पाहिजे. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपले सरकार गरीबांसाठी काम करणार असल्याचे सांगत असतात. पण कोणताही विरोध न करता आमदार खासदारांच्या निवृत्तीवेतनात आणि मानधनात वाढ केली जाते. जर का हे लोकप्रतिनिधी आपले मानधनही मर्यादित ठेवू शकत नसतील तर ते सामान्य माणसाला दिलासा देणारे निर्णयही घेऊ शकत नाहीत हे स्पष्ट होते.

### लोकांची कसोटी नको

राज्यात ही वीज दरवाढ अशावेळेत होत आहे की, निवडणुकीच्या धामधुमीत त्याला विरोधही होण्याची शक्यता नाही. मात्र निवडणुकीनंतर पुढच्या सहा महिन्यात राज्यात निवडणुका होतील. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकार कोणतीही मोठी करवाढ किंवा दरवाढ करणार नाही. मात्र या अशा दरवाढीचा जनता राज्य सरकारला निवडणुकीतून जाब विचारू शकेल. अन्य राज्यांमध्ये वीजेचे दर नियंत्रणात आहेत शिवाय चोवीस तास अखंड वीजपुरवठा होत राहातो. महाराष्ट्रात अजूनही भारनियमन तर होतेच. परंतु वीज दरवाढीचे चटकेही दिले जातात. महाराष्ट्राची वीजेची गरज दिवसेंदिवस वाढत आहे पण वीज पुरवठा सुरळीत राहील अशा प्रकारचे वीज उत्पादन राज्याकडून होताना दिसत नाही. यासाठी नवनवीन कल्पना राबवाव्यात याचीही सरकारला गरज वाटत नाही. एकूणच भविष्यकाळाचा विचार केला तर सतत वाढणारे तापमान त्यातून वीजेची वाढणारी मागणी याच्यात संतुलन साधायचे असेल तर अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांमधून वीज मिळवली पाहिजे. नागपूरमध्ये सुरु झालेल्या मेट्रोसाठी जवळपास चाळीस टक्के वीज ही सौर ऊर्जेतून प्राप्त केली जाते. जगाच्या अनेक भागात रेल्वे, विमाने किंवा मोठमोठे उद्योग आता सौर ऊर्जेतून आपली गरज भागवताना दिसतात. महाराष्ट्रालासुध्दा याच मार्गाने गेले पाहिजे. सातत्याने दरवाढ करून लोकांची कसोटी पाहाण्याचे दिवस आता उरलेले नाहीत.